**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव ३ (                    ) : तंत्रज्ञानाच्या युगात दिव्यांग व्यक्तींनी मागे राहू नये म्हणून त्यांच्यासाठी नवनवीन सॉफ्टवेअर तयार झाले आहेत. या तंत्रज्ञानाचा उपयोग दिव्यांग व्यक्तींनी करावा असे आवाहन टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईच्या डॉ. वैशाली कोल्हे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या रूसा समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर अध्यक्षस्थानी होते यावेळी मंचावर कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. कोल्हे म्हणाल्या की, भारत सरकारद्वारा दिव्यांगांच्या सुविधा व सवलतींचा नव्याने समावेश करण्याविषयी नवीन कायदा तयार करण्याचे कार्य चालू आहे. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे तेव्हा दिव्यांग व्यक्तिंसाठी तयार करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरचा उपयोग करणे गरजेचे आहे यामुळे आपल्याला कमी लेखले जाणार नाही. नवीन कायद्यात प्राथमिक शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा व बदल करण्याबाबतही तरतूद करण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे डॉ.कोल्हे यांनी सांगितले.यावेळी त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दिव्यांगाना उत्तम सुविधा दिल्या जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर म्हणाले की, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या सहकार्याने विद्यापीठातील दिव्यांग कर्मचारी व विद्यार्थ्यांना विद्यापीठ जास्तीत जास्त सुविधा विनामूल्य देण्याबाबत प्राधान्य देत आहे. संगणकाचे ज्ञान आत्मसात करा तसेच रूसाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी सहभागींच्या प्रश्नांचे निरसनही करण्यात आले.

प्रेरणा बहुउद्दशिय संस्था,चाळीसगाव, जामनेर, भडगाव, एरंडोल, जळगाव आदी भागातून ८८ पेक्षा अधिक दिव्यांग विद्यार्थी व व्यक्तिंनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. संजय बडगुजर व कमलाकर सोनार यांनी सहभागींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक रूसाचे समन्वयक प्रा.राम भावसार यांनी तर सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले. आभार डॉ.अनिल चिकाटे यांनी मानले. प्रा.संतोष खिराडे, विजय अहेर, दिव्या बोरसे, मयुर देसले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018      दिनांक : 3 डिसेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ ( ) बहिणाबाई हा चमत्कारच असून काळाला देखील बहिणाबाई पुन्हा घडवता येणार नाही. जात-धर्म-प्रांत आणि भाषेच्या सिमा ओलांडलेल्या या कवयित्रीचा प्रभाव अनेक पिढयांवर कायम राहिला आणि भविष्यातही राहिल असे प्रतिपादन सुप्रसिध्द कवी प्रा.इंद्रजित भालेराव यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या स्मृती दिनानिमित्त सोमवार, दि.३ डिसेंबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रा. इंद्रजित भालेराव यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.आशुतोष पाटील यांची उपस्थिती होती.

प्रा.भालेराव म्हणाले की, वाडमय हे आयुष्याशी निगडित असते. ज्ञान अथवा विज्ञान काळानुरुप बदलत असते. मात्र वाडमय चिरंतन असते. बहिणाबाईंचे वाडमय देखील चिरंतन आहे. बहिणाबाई हा चमत्कारच समजला पाहिजे. विद्यापीठाला बहिणाबाईंचे नाव देता येते. मात्र विद्यापीठाला बहिणाबाई निर्माण करता येणार नाही. काळालाही बहिणाबाई घडविता येणार नाही. जगातील कोणत्याही भाषेत बहिणाबाईंसारखी कवयित्री निर्माण झालेली नाही. बहिणाबाईंना कोणी घडविले नाही. त्या शिकलेल्या नव्हत्या म्हणूनच त्यांना एक चमत्कारच म्हटले पाहिजे. जाती-धर्माच्या सिमा त्यांनी कधीच ओलांडल्या. काळावर मात करणाऱ्या या कवयित्रीचा प्रभाव अनेक पिढयांवर कायम राहिल. विज्ञान न शिकता देखील त्यांच्या कविता अंधश्रध्देच्या आहारी जाणाऱ्या नाहीत. त्यांच्या कविता मराठी स्त्री साहित्यात मॉडेल झालेल्या आहेत असे सांगताना प्रा.भालेराव यांनी बहिणाबाईंच्या काव्य निर्मितीची प्रक्रिया आणि काही कवितांचे पदर उलगडून दाखविले. यावेळी प्रा.भालेराव यांनी विद्यापीठातील बहिणाबाई चौधरी अध्ययन केंद्राने लेवा समाजाचा इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास करावा तसेच बहिणाबाईंच्या कवितांचा हिंदी व इंग्रजी अनुवाद करण्यासाठी पुढाकार घ्यावा. याशिवाय बहिणाबाईंच्या कवितेचा मुळ लेवा बोली भाषेत शोध घ्यावा अशा काही सूचना केल्या. इंद्रजित भालेराव यांनी स्वत:च्या दोन कविता देखील सादर केल्या.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यापीठाला बहिणाबाईंचे नाव दिल्यामुळे जबाबदारी वाढली असल्याचे सांगून महिला सक्षमीकरणासाठी विद्यापीठ पाऊले उचलत असल्याचे सांगितले. बहिणाबाईंच्या कवितांमध्ये तत्वज्ञान सांगण्याची ताकद आहे. जगण्याबद्दल, माणसांबद्दल त्यांनी कधीच कुरकूर केली नाही. निसर्ग, पाऊस, शेतीतील कामे, घरातील कामे, सण-उत्सव नातीगोती अशा सगळयांशी समरस होऊन बहिणाबाई जगल्या असेही ते म्हणाले.

प्रारंभी केंद्राचे प्रमुख डॉ.आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नेत्रा उपाध्ये या विद्यार्थिनीने केले. यावेळी संगीत विभागप्रमुख प्रा.संजय पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली श्रुती जोशी व भाग्यश्री भंगाळे यांनी बहिणाबाईंची गीते सादर केली. हार्मोनियमवर अक्षय गजभिये व तबल्यावर राहुल कासार यांनी साथ दिली. उत्कर्षा माळी व कल्याणी वाणी यांनी साथसंगत केली.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 3 डिसेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी